महाराष्ट्र शासन
महसुल व वनविभाग

# जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना शाखा

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग, हिराकोट तलावाजवळ, ता. अलिबाग, जि. रायगड
**दुरध्वनी क्र. (०२१४१)-२२७१२०,** Email:- **egsraigad@gmail.com**

क्र. मग्रारोहयो/कात-२/साअंसो-जाहिरात/ ५९६ /२०२३ दिनांक - २६/१०/२०२३

महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी यांचेकडीलपत्र क्र. साव्यसे-३१२३/प्र.क्र.५८/साअंसो दिनांक २८ जुलै, २०२३

# जाहिरात

**विषय :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी साधन व्यक्ती पदावर दैनंदिन मानधन तत्वावर पॅनलवर नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेबाबत- जाहिरात

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणा-या कामांचे ग्रामपंचायत पातळीवरील सामाजिक अंकेक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी वर सोपविण्यात आली आहे. या कामकाजासाठी ग्रामपातळीवर विविध घटकांचे प्रतिनिधींमधून साधन व्यक्तींची नियुक्ती सोसायटीच्या पॅनलवर दैनंदीन मानधन तत्वावर करण्यात येते. यासाठी खालील अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदावर १०० पात्र उमेदवारांची पॅनलवर नियुक्ती करावयाची आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत जोडलेल्या नमुन्यात आपला अर्ज स्व:हस्ताक्षरात भरून आवश्यक कागदपत्रांसह उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड- अलिबाग यांच्या कार्यालयात **दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३** पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. विहित कागदपत्रे सोबत नसलेले व अपूर्ण माहितीसह प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१.साधन व्यक्ती पदासाठी सोबत प्रदर्शित केलेल्या विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा.
२.साधन व्यक्ती पदासाठी उमेदवारचे किमान १८ वर्षे असावे. कमाल वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.
३.ग्राम साधन व्यक्ती पदासाठी उमेदवार किमान १० वी पास असावा. १० वी पास उमेदवार उपलब्ध न झाल्यास किमान ८ वी पास असलेल्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाईल. यासाठी कमाल शिक्षणाची मर्यादा नाही.
४.सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.
५.साधन व्यक्तींची निवड करतांना पुढील गटातील व्यक्ती यांना प्राधान्य राहील.
१) प्रोजक्ट लाईफ मध्ये काम केलेले मजूर( अ.जा/अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
२) मग्रारोहयो वर काम केलेले मजूर (अ.जा/अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
३) जॉब कार्ड धारक मजूर (अ.जा/अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
४) यापुर्वी सामाजिक अंकेक्षण प्रक्रीयेमध्ये काम केलेले उमेदवार.
५) भारत निर्माण सेवक/इतर शासकीय योजनांमध्ये क्षेत्रीय कामकाज केलेले उमेदवार/स्वयंसेवी संस्थेमध्ये क्षेत्रीय कामकाज केलेले उमेदवार (अ.जा/अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
६) जॉबकार्ड नसणारे परंतु कुटूंब पत्रकात समाविष्ट असलेली मुले/मली (किमान वय वर्ष १८) (अ.जा/अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
७) MWS/NSS चे विद्यार्थी (अ.ज./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
८)अ.जा/अ.ज. २५% व महिला मजूरांना एक तृतियांश आरक्षण अनुज्ञेय राहील.

६.छाननी करून विहित अर्हता व कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या अर्जाच्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

७.साधन व्यक्ती म्हणून निवड झाल्यावर ते ज्या गावातील रहिवाशी आहेत त्या गावाची ग्राम पंचायत सोडून नेमुन दिलेल्या अन्य ग्रामपंचायतीत जेथे सामाजिक अंकेक्षण होणार आहे, अशा ठिकाणी निवासी राहून काम करावे लागेल.

८.निवड केलेल्या साधन व्यक्तींना ४ दिवसांच्या निवासी प्रशिक्षणासाठी हजर रहावे लागेल.

९.सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया सुरू असताना साधन व्यक्तीस अंमलबजावणी यंत्रणेत काम करणा-या अधिकारी, पदाधिकारी किंवा कर्मचा-यांच्या घरी मुक्काम करता येणार नाही.

१०.निवड समिती मार्फत उमेदवारची पॅनलवर निवड झाल्यानंतर वेळोवेळी देय होणा-या त्यांच्या मानधनाच्या रक्कमा त्यांना बँकेव्दारे अदा करण्यासाठी सोसायटीने निश्चित केलेल्या बँकेत बँक खाते उघडावे लागेल.

११.प्रत्यक्ष सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया सुरू असताना पॅनल वरील साधन व्यक्तींना आवश्यकतेनुसार काम उपलब्ध करून देण्यात येईल. सामाजिक संकेक्षण प्रक्रीया समाप्त होताच साधन व्यक्ती यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल.

१२.निवड करण्यात येणा-या साधन व्यक्ती यांना अंकेक्षण प्रक्रियेत सहभागी करून घेतल्यानंतर त्या कालावधीत सोसायटीने वेळोवेळी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे त्यांनी केलेल्या कामासाठी मानधन अनुज्ञेय राहील.

१३.अंकेक्षणाचे काम कोणतीही त्रुटी न ठेवता त्यांनी समाधानकारकरित्या काम पुर्ण केल्याची खात्री झाल्यानंतर मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल.

१४.अंकेक्षणाच्या काळात प्रवास खर्चापोटी सोसायटीने वेळोवेळी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे एकत्रित रक्कम साधन व्यक्तींना अनुज्ञेय राहील.

१५.ग्राम साधन व्यक्ती पदासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, उमेदवारांचा प्रशिक्षणातील सहभाग, तत्परता, कामाची गुणवत्ता, अनुभव या बाबींचा विचार करून त्यांच्यामधून समूह साधन व्यक्ती व तालुका साधन व्यक्ती या पदावर निवडक उमेदवारांनी नियुक्ती देण्याचा विचार केला जाईल.

१६.साधन व्यक्ती पदावर निवड झालेल्या कोणत्याही उमेदवाराला सोसायटीच्या सेवेत कायम स्वरूपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही.

१७.वरील पदावर निवड व प्रशिक्षण झालेल्या उमेदवारांना सोसायटीला आवश्यक तेव्हा सामाजिक अंकेक्षण प्रक्रीयेत सहभागी होणे बंधनकारक राहील. तसे हमीपत्र उमेदवारांना द्यावे लागेल.

****************************************

(भारत वाघमारे)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक
रायगड-अलिबाग